**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १५४ अन्वये निदेश.**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने त्यांचे नियोजन क्षेत्राचे प्रस्ताव तयार करतेवेळी मंजूर प्रादेशिक योजना / विकास योजनांचे प्रस्ताव विचारात घेण्याबाबत.....

# महाराष्ट्र शासन

**नगर विकास विभाग,**

**शासन निर्णय क्रमांक : टिपीएस-१८१८/१६४६/प्र.क्र.२५१/१८/नवि-१३.**

**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**दिनांक: ०६/१०/२०१८.**

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ४०(१क) मधील तरतुदीनुसार ज्या क्षेत्रासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ मधील प्रकरण ६ लागू होते किंवा शासकीय जमिनीसह अन्य कोणतेही क्षेत्र महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे हस्तांतरित केले असल्यास, अशी क्षेत्रे "अधिसूचित क्षेत्र म्हणून समजण्यात यावे आणि अशा अधिसूचित क्षेत्रांबाबत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ हे या अधिनियमाच्या प्रयोजनाकरीता विशेष नियोजन प्राधिकरण राहील, अशी तरतुद आहे.

०२. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियमाचे कलम ४० चे पोटकलम (४) व (५) येथील तरतदी विचारात घेता, शासनाने औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिसूचित क्षेत्राकरीता कलम ४०(३) मधील उपकलम (डी) नुसार कलम ११५(१) अन्वये सादर विकास नियंत्रण नियमावली मंजूर केलेली असल्याने औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिसूचित क्षेत्रात ही मंजूर नियमावली लागू आहे. त्यामुळे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिसूचित क्षेत्रात प्रादेशिक योजना किंवा परियोजनेच्या विकास नियंत्रण नियमावलीबाबतच्या तरतुदी लागू होत नाहीत. मात्र, वर नमूद महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियमातील कलम ४० चे पोटकलम ४ नुसार विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून औद्योगिक विकास महामंडळाने अधिसूचित क्षेत्रात विकास करतांना अधिसूचित क्षेत्रात अगोदरच लागू असलेल्या प्रादेशिक योजना किंवा विकास योजना वा नगररचना योजना इत्यादींचे प्रस्ताव देखील विचारात घेणे आवश्यक आहे.

०३. वरील बाब विचारात घेता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकरीता अधिसूचित क्षेत्र व त्या लगतच्या प्रादेशिक योजना / विकास योजना क्षेत्र अशा दोन्ही क्षेत्रामधील रस्त्यांच्या नियोजनात एकसुत्रता रहावी या दृष्टीकोनातून महामंडळाने त्यांच्या अधिसूचित क्षेत्रात कलम ४० (३) मधील उपकलम (डी) नुसार कलम ११५(१) अन्वये विकास विषयक प्रस्ताव तयार करताना, सदर क्षेत्र अधिसूचित करण्यापुर्वी अगोदरच अंमलात असलेल्या मंजूर प्रादेशिक योजना, विकास योजना वा नगररचना योजना इत्यादीमधील रस्त्यांचे प्रस्ताव **विचारात घेणेसंबंधी विशेष दक्षता** घेणे व त्या दृष्टीने नियोजन करणे आवश्यक आहे.

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, MUMBAI-32

०४. याबाबीचा विचार करुन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियमाचे, १९६६ चे कलम १५४ अन्वये खालीलप्रमाणे निदेश देण्यात येत आहेत.

## निदेश.

"महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने त्यांच्यासाठीच्या अधिसूचित क्षेत्राचे विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून विकास विषयक प्रस्ताव तयार करताना, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियमाचे कलम ४० चे पोटकलम (४) व (५) चे काटेकोरपणे पालन होईल याची दक्षता घ्यावी. त्याचप्रमाणे असे नियोजनाचे प्रस्ताव तयार करताना त्याक्षेत्रात अगोदरच अंमलात असलेल्या मंजूर प्रादेशिक योजना, विकास योजना वा नगररचना योजना इत्यादीमधील रस्त्यांचे प्रस्ताव **विचारात घेणेसंबंधी विशेष दक्षता** घेऊन तसे नियोजन करण्यात यावे. "

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानूसार व नावाने.

( रा. म. पवार )
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी**
मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई.

**प्रत :-**
१) मा. मुख्यमंत्री यांचे सचिव.
२) मा. राज्यमंत्री, (नगर विकास), यांचे खाजगी सचिव.
३) मा.प्रधान सचिव, उद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) प्रधान सचिव, नवि-१, यांचे स्वीय सहायक.
५) मा.प्रधान सचिव, नवि-२, यांचे स्वीय सहायक.
६) सह सचिव, तथा संचालक,(नगर रचना), नगर विकास विभाग, यांचे स्विय सहायक.
७) चिफ प्लॅनर, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई.
८) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
/- सदर निदेशाची प्रत नगर रचना संचालनायलाचे वेबसाईटवर प्रसिध्द करावी व शाखा कार्यालयांना पाठविण्यात यावी.
९) सहसंचालक, नगर रचना, कोकण/पुणे/नाशिक/नागपूर/अमरावती/औरंगाबाद.
१०) अवर सचिव, नवि-११,नवि-१३ नवि-३०/कक्ष अधिकारी,नवि-०९, नवि-१२,नगर विकास विभाग.
११) कक्ष अधिकारी (नवि-२९) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
/-त्यांना विनंती करण्यात येते की, सदरचे निदेश या विभागाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणेबाबत कार्यवाही करणेत यावी.
१२) कक्ष अधिकारी, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई.
/- त्यांना विनंती करण्यात येते की, सदरचे निदेश शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावी.
१३) निवडनस्ती (नवि-१३).